MHSO110010182023

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ४६३/२०२३</u>**

धनराज मोरे विरुध्द आनंदराव मोरे

**<u>निशाणी क्र. ४४ वरील आदेश</u>**

सदरचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र. ४ यांचे वारस पटलावर घेणे कामी झालेला अबेटमेंट सेट असाईडचा हुकुम रदद् बातल होवुन मिळणेसाठी सदरहु अर्ज केलेला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र ०४ अरुणा तुळशिराम मोरे या दिनांक २७.०९.२०२४ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांना प्रतिवादी क्र १ आनंदराव याने तसे प्रतिज्ञापत्र करुन गावचे हक्क पत्रामध्ये प्रतिवादी क्र ४ हिच्या मृत्युनंतर नोंद लावून घेतल्याचे वादीस समजले आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र ४ अरुणा हिचा वारस प्रतिवादी क्र १ आनंदराव आहेत व ते दाव्यात समाविष्ठ आहेत. मयत प्रतिवादी क्र ४ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी वादींना ०१ वर्ष ८७ दिवसांचा विलंब झालेला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र ४ विरुध्द दावा ॲबेट झाला आहे. प्रस्तुत दावा हा निरंतर ताकीदीसाठी असल्याने मयत वारस रेकॉर्डवर न आणल्यास वादीचे कधीही न करुन येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब पारीत करण्यात आलेला अबेटमेंट सेट असाईडचा हुकुम रदद् बातल करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांचे विधिज्ञांनी म्हणणे देवुन योग्य तो आदेश पारीत करण्याची विनंती केली आहे.

४. दावा आणि अभिलेखावरील अर्जाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा सदर निरंतरचे ताकीदीसाठी केला आहे. अशा दाव्याकरिता सर्व पक्षकारांचा समावेश दाव्याकामी असणे दाव्याच्या अंतिम निकालाकरिता आवश्यक आहे. सबब वादीविरुध्द पारीत करण्यात अबेटमेंट सेट असाईडचा हुकुम रदद् बातल करणे न्यायोचित होईल. त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब प्रस्तुत

अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. परिणामी खालील आदेश.

**<u>आदेश</u>**

१. वादीचा अर्ज निशाणी क्र. ४४ मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र ०४ अरुणा तुळशिराम मोरे यांच्या वारसांची नावे अभिलेखी घेण्यास झालेला अबेटमेंट सेट असाईडचा हुकुम हा वादीने रक्कम रुपये ५००/-(अक्षरी रुपये पाचशे मात्र) सरकार जमा करण्याच्या अटीवर प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by GAIKWAD MOHINI JANU
Date: 2026.01.01 17:33:42 +0530

(एम.जे.गायकवाड)
दिनांक ०१.०१.२०२६ ४थे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर,
माळशिरस

## C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this PDF file order are same word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| **Name of the Court** | **:** | 4th Jt. C.J.J.D & J.M.F.C., Malshiras. |
| **Name of Stenographer** | **:** | Praveen Nagnath Nalla |
| **Order signed by the Presiding Officer on** | **:** | 01 / 01 / 2026. |
| **Order uploaded on** | **:** | 01 / 01 / 2026. |